**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, 'कनिष्ठ स्तर' न्यायालय, अंबाजोगाई**
**ता.अंबाजोगाई जि.बीड**

Exh.01/B

कि.दि.अर्ज.क्र.719/2025.



अर्जदार :– 1) शारुबी भ्र. उस्मान शेख, वय 64 वर्षे, धंदा घरकाम
रा. बाभळगाव ता.अंबाजोगाई जि.बीड



2) मैदा भ्र. फरीद शेख, वय 53 वर्षे, धंदा घरकाम
रा. खतीब गल्ली, अंबाजोगाई जि.बीड



3) हाजराबी भ्र. बशिरखाँ पठाण, वय 54 वर्षे, धंदा घरकाम
रा. तांदुळजा ता. जि.लातूर



4) फतरु पिता गायबु शेख, वय 55 वर्षे, धंदा मजुरी
रा. जवळगाव ता. अंबाजोगाई जि.बीड



5) सलिमाबी भ्र. रहीम शेख, वय 60 वर्षे, धंदा मजुरी
रा. जवळगाव ता. अंबाजोगाई जि.बीड

**विरुध्द**

कोणीही नाही

प्रकरण :– **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट 1827/8 कलम 2 प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**अर्जदार क्र. 1 ते 5 यांच्यावतीने खालील प्रमाणे विनंती अर्ज सादर**

1. हे की, अर्जदार हे वर नमुद पत्त्यावरील रहिवाशी असून अर्जदार क्र. 1 ते 4 हे आपसात सख्खे बहीण भाऊ असून अर्जदार क्र. 5 ही अर्जदार क्र. 1 ते 4 यांचा मयत भाऊ रहिम गयबु शेख यांची पत्नी आहे.

2. हे की, मौजे जवळगाव ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहिवाशी असलेले अर्जदार क्र. 1 ते 4 यांचे वडील अर्जदार क्र. 5 यांचे सासरे नामे **कै. गयबु रतन शेख** यांचे दिनांक 01/09/2020 रोजी राहत्या घरी मौजे जवळगाव ता.

अंबाजोगाई जि.बीड येथे निधन झालेले असून त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, जवळगाव अंबाजोगाई जि.बीड येथे झालेली असून ग्रामपंचायत कार्यालय, जवळगाव अंबाजोगाई जि.बीड येथे यांनी दिलेले मृत्युप्रमाणपत्र या अर्जासोबत सादर करण्यात आलेले आहे. तसेच मयत **कै. गयबु रतन शेख** यांच्या पत्नी अर्जदार क्र. 1 ते 4 यांची आई माशिमबी शेख यांचेही पुर्वीच निधन झालेले आहे. तसेच मयत **कै. गयबु रतन शेख** यांची आई नामे. शेख फतरु रतन यांचेही पुर्वीच निधन झालेले आहे. तसेच मयत **कै. गयबु रतन शेख** यांचा मुलगा व अर्जदार क्र. 5 यांचे पती नामे **रहिम गयुब शेख** याचेही दिनांक 20/03/2023 रोजी निधन झालेले आहे.

3. हे की, त्यामुळे मयत **कै. गयबु रतन शेख** यांचे पश्चात अर्जदार क्र. 1 ते 3 हया मुली अर्जदार क्र. 4 हा मुलगा व अर्जदार क्र. 5 ही सुन या नात्याने कायदेशिर वारस आहेत. अर्जदार क्र. 1 ते 5 यांचे शिवाय मयतास ईतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

4. हे की, अर्जदार क्र. 1 ते 5 यांना मयत **कै. गयबु रतन शेख** यांच्या पश्चात कायदेशिर वारस या नात्याने मयताच्या या पश्चात शासकीय व निमशासकीय तसेच कार्यालयीन कामासाठी लागणाऱ्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी मा. न्यायालयात प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

5. हे की, अर्जदारांनी **कै. गयबु रतन शेख** यांच्या निधनानंतर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी फक्त या न्यायालयात अर्ज केलेला असून या न्यायालया शिवाय दुसऱ्या कुठल्याही न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केलेला नाही.

6. हे की, मयत **कै. गयबु रतन शेख** येथील मा. न्यायलयाच्या हद्दीतील कायमचे रहिवाशी असल्याने व त्यांचे निधनही मा.न्यायालयाच्या हद्दीत झालेले

असल्याने या मा. न्यायालयास सदर प्रकरण चालविण्याचा व वारस प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे.

अशा परिस्थितीत अर्जदार क्र. 1 ते 5 शिवाय मयत **कै. गयबु रतन शेख** यांना दुसरे कोणीही कायदेशिर वारस नसल्यामुळे अर्जदार क्र. 1 ते 5 हेच मयत **कै. गयबु रतन शेख** यांचे कायदेशिर वारस असल्याचे घोषीत करुन अर्जदार क्र. 1 ते 5 यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र मिळणे योग्य व आवश्यक आहे. सोबत शपथपत्र देण्यात येत आहे.

## तरी विनंती की

अर्जदाराचा अर्ज मान्य करण्यात यावा व अर्जाप्रमाणे अर्जदार क्र. 1 ते 5 हे **कै. गयबु रतन शेख** यांचे कायदेशिर वारस असल्याचे घोषीत करुन अर्जदार क्र. 1 ते 5 यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

दिनांक :– 22 / 11 / 2025

अर्जदार

**1) शारुबी भ्र. उस्मान शेख,**

**2) मैदा भ्र. फरीद शेख,**

**3) हाजराबी भ्र. बशिरखाँ पठाण,**

**4) फतरु पिता गायबु शेख,**

शेख साकीमाबी

**5) सलिमाबी भ्र. रहीम शेख,**

ORDER

--------------------

Issue citation and paper proclamation as per rule.

Sd/-

I/c.2nd Jt.CJJD,Ambajogai

## सत्यापन

सदर अर्जातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर मी समजुन उमजुन तसदिका केल्या.

दिनांक :– 11 / 12 / 2025

अर्जदार

1) शारुबी भ्र. उस्मान शेख,

2) मैदा भ्र. फरीद शेख,

3) हाजराबी भ्र. बशिरखाँ पठाण,

4) फतरु भ्र. गायबु शेख,

मार्फत

ॲड. व्ही.आर. देशमुख
ॲड. बी.ए.पुरी
अंबाजोगाई